**<u>नियमित दिवाणी दावा नं. ८०/२०२४</u>**
**<u>(स्वाती मयत तर्फे ऐश्वर्या वि. अनिता मयत तर्फे सुरेश)</u>**

**<u>निशाणी क्र. १९ खालील आदेश</u>**
**<u>(दिनांक १२.०८.२०२४)</u>**

वादीने प्रतिवादीविरुध्द निशाणी क्र. १९ खालील अर्ज जैसे थे चे आदेश पारीत करण्यासाठी दाखल केला.

२. वादीच्या म्हणण्युनसार, प्रस्तुत दाव्याची नोटीसची बजावणी प्रतिवादी यांना झाल्यापासून यातील सर्व प्रतिवादी हे जास्तीच चिडून जावून दावा कलम १/ब या वाद मिळकतीमधील तयार फलॅट व दुकान गाळे याची बेकायदेशीररित्या बोगस नोटरी करारपत्राद्वारे विल्हेविक्री करण्याच्या प्रयत्नात असल्याचे वादी यांना खात्रीलायक समजून आले आहे व प्रतिवादी हे सदरची वाद मिळकत ही विकण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे तुतातूर्त ताकीद अर्जाच्या अंतिम आदेशापर्यंत जैसे थे ठेवण्याचे आदेश प्रतिवादीविरुध्द पारित करण्यात यावेत, अशी वादीने विनंती केली.

३. प्रतिवादीने सदर अर्जाला त्यांचे म्हणणे दाखल करुन असे कथन केले की, प्रस्तुतच्या अर्जातील कथने, मजकुर व मागणी ही खोटी, चुकीची व न्यायालयाची दिशाभूल करणारी आहे. सदरचा दावा दाखल करण्यास वादीला कोणतेही कारण घडलेले नाही. प्रतिवादीने पुढे असे कथन केले की, सदरकामी मा. जिल्हा न्यायालय, सांगली यांचेकडील रे.सि.अ.नं. ३०१/२०१३ चे कामी जिल्हा न्यायालयाने दिलेल्या निर्णयाविरुध्द प्रतिवादीचे पुर्वाधिकारी यांनी दुसरे अपिल क्र. ४९६/२०२० चे दाखल केलेले असून त्याकामी मा. उच्च न्यायालयाने रे.सि.अ.नं. ३०१/२०१३ चे हुकूमाचे अंमलबजावणीस स्थगिती दिलेली आहे व त्याची सर्व माहिती वादी यांना आहे. तसेच वादी या न्यायालयात रे.सि.अ.नं. ३०१/२०१३ चे कामी दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणीकरिता डिक्री फायनल अर्ज क्र. ०४/२०१९ दाखल केलेला असून यातील वादी यांनी मयत प्रतिवादी यांचे पुर्वाधिका–यांचे वारसांबाबत पूर्तता केलेली नाही. तसेच डिक्री फायनल अर्ज क्र. ०४/२०१९ चे काम थांबलेले आहे. वादी यांना सदर दावा

दाखल करण्यास कोणतेही कारण घडलेले नाही तसेच सदरचा दावा हा चालणेस पात्र नाही. करिता, सदरचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

४. वादी यांचा अर्ज व प्रतिवादी यांचे म्हणणे वाचले. दोन्ही पक्षकारांचा युक्तिवाद ऐकला. वादीच्या दाव्याचे व दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. सदरचा दावा हा वादीने प्रतिवादीविरुध्द हक्कज्ञापनासाठी, निरंतर ताकीदीसाठी आणि कारक ताकीदीसाठी दाखल केला आहे. वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी हे वाद मिळकत ही तबदिल व विक्री करण्याच्या तयारीत आहेत. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने नि.दि.दा.क्र. ६१५/२००८ हा प्रतिवादीविरुध्द वाटणीसाठी दाखल केला होता. सदरचा दावा हा दि. ०४.०५.२०१३ रोजी निकाली झाला आणि वादीचा दावा हा रदद करण्यात आला. त्यानंतर वादीने सदर न्यायनिर्णयाविरुध्द मा. जिल्हा न्यायालय, सांगली येथे रे.सि.अ.नं. ३०१/२०१३ अपिल दाखल केले व त्याचा दि. २०.०९.२०१९ रोजी निकाली झाला. त्यामध्ये मा. जिल्हा न्यायालय यांनी वादी यांचा वाद मिळकतीमध्ये अर्धा हिस्सा ठरवला. त्यानंतर प्रतिवादी यांनी सदर न्यायनिर्णयाविरोधात मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे अपिल दाखल केले असून ते सध्या न्यायप्रविष्ठ आहे. मा. जिल्हा न्यायालय, सांगली यांनी जो निकाल दिला होता तो निकाल हा मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी स्टेयड केलेला आहे. रे.दि.दा.क्र. ६१५/२००८ मध्ये जी मिळकत नमुद केली होती तिच मिळकत सदर दाव्यामध्ये नमूद केली आहे. सदरच्या मिळकतीबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे अपिल प्रलंबित असल्यामुळे वाद मिळकतीमध्ये वादी यांचा अर्धा हिस्सा हा अंतिम झालेला नाही. (It is a settled position of law that, appeal is nothing but the continuation of suit.) त्यामुळे वादीचा सदरचा अर्ज चालण्यास पात्र नाही. करिता वरील सर्व बाबींचा विचार करता मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

निशाणी क्र. १९ वरील अर्ज नामंजुर करण्यात येतो.

PRANESHKUMAR BADRINATH BHARPURE

Digitally signed by PRANESHKUMAR BADRINATH BHARPURE
Date: 2024.08.13 17:23:47 +0530

पलूस.
दिनांक १२.०८.२०२४.

दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पलूस.